# उपयोजित नीतिशास्त्र

## समस्या व उपाय

संपा. डॉ. सुनील साळुंके

SHIVAJI COLLEGE • HINGOLI

Lecturer
Shivaji College, Hingoli
Hingoli (M.S.)

Scanned with OKEN Scanner

# उपयोजित नीतिशास्त्र :समस्या व उपाय

:: संपादक मंडळ ::
डॉ.सुनील साळुंके
डॉ. सुरेंन्द्र गायधने
डॉ.दिलीप नागरगोजे
प्रा.शीतल येरुळे

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •

अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषद
२०१९

T.C

Assistant Professor
Shivaji College,Hingoli,
Tq.& Dist.Hingo...

Scanned with OKEN Scanner

- **उपयोजित नीतिशास्त्र :समस्या व उपाय - डॉ. सुनील साळुंके (मुख्य संपादक)**

  –Upayojit neetishastra: Samasya Va Upay - Dr.Sunil Salunke (Chief Editor)
- **प्रथमावृत्ती** - फेब्रुवारी,२०१९.


**©अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषद**


- **प्रकाशक:**व्यंकटराव मोरे

  मैत्री प्रकाशन,

  सिद्धेश्वर रोड, देशपांडे गल्ली,

  लातूर-४१३५१२

  मो. 9850740367/ 8329351614
- **मुद्रणस्थळ :** रुद्रायणी ऑफसेट, औरंगाबाद.
- **मुखपृष्ठ :** श्री. बालाजी लांडगे
- **पृष्ठ जुळणी :** डॉ.संगीता मोरे
- **पृष्ठ संख्या :** 298
- **मूल्य :** ₹. 300/-
- ISBN:978-93-84810-46-7



T.C

Lecturer

Shivaji College,Hingoli

Ta.& Dist.Hingoli (MS.)

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •


## संपादकीय...

पारंपरिक नीतिशास्त्रातील मूल्ये, तत्त्वे,आदर्श, सिद्धांत यांची मानवी जीवनातील आवश्यकता आपल्याला नाकारता येत नाही. तरी पण वर्तमानकाळातील बदललेली जीवनशैली आणि बदललेले सामाजिक संदर्भ यामुळे ती सर्व मूल्ये, तत्त्वे आणि आदर्श आज अपुरे पडत चालले आहेत. नवनवीन प्रकारच्या नैतिक समस्यांचा उद्‌भव होऊ लागला आहे. व्यक्तीगत नैतिकतेपेक्षा सामाजिक नैतिकतेचा विचार अधिक प्रभावशाली ठरू पहात आहे. व्यक्तीगत जीवनात नीतिमूल्यांची जोपासना करणे ही मानवी जीवनातील पहिली अनिवार्य पायरी आहे. पण त्यापुढे जाऊन मानव हा समाजशील प्राणी आहे याचाही आपल्याला विसर पडता कामा नये. पारंपरिक नीतिमूल्यांना छेद देणाऱ्या नविन नैतिक संकल्पना आज समाजात रूढ झाल्या आहेत, रूढ होत आहेत. त्यांचा आजच्या संदर्भात तटस्थपणे विचार करणे ही खरी गरज निर्माण झाली आहे. हीच या ग्रंथामागची मूळ भुमिका आहे.यासाठी योगदान दिलेल्या सर्व लेखकांचे मनस्वी आभार.

– संपादक मंडळ


Scanned with OKEN Scanner

## अनुक्रमणिका


01.त्रिस्तरीय उपयोजित नीतिशास्त्राची दिशा : डॉ. शर्मिला जयंत वीरकर ...007
02.आदर्शी आणि उपयोजित नीतिशास्त्र व मानवी जीवन :डॉ. सुरेन्द्र गायधने ... 013
03.उपयोजित नीतिशास्त्राचे स्वरुप आणि प्रकार :डॉ.एन.के.रासकर ... 017
04.नैतिक सिध्दांताचे उपयोजित नीतिशास्त्र : विकास गायकवाड ... 023
05.उपयोजित नीतिशास्त्र : समस्या आणि उपाय : डॉ.माधवी बादाडे ... 025
06.नीतिचे मानवी जीवनातील अनन्यसाधारण महत्व : मोनालिसा अ. खानोरकर ... 029
07.सरोगसी नियमन : वैशाली माधवराव दिवे ... 034
08.सरोगसी आणि नैतिकता : डॉ.सुनंदा भुसारे ... 042
09.क्लोनिंग तंत्रज्ञान आणि काही नैतिक प्रश्न : डॉ.सचिन खोकले ... 048
10.आत्महत्या: एक नैतिक समस्या : डॉ. स्वाती कुलकर्णी ... 053
11.मानवी अवयव प्रत्यारोपण संकल्पना आणि नीतिशास्त्र : डॉ. प्रभाकर किर्तनकार ... 060
12.दयामरण आणि नैतिकता : डॉ. अनिल शिंदे ... 063
13.दयामरण एक नैतिक चिंतन : डॉ. बालाजी नरवाडे ... 066
14.दयामृत्यू :एक तात्विक चिकित्सा : डॉ. ग्यानदेव उपाडे ... 072
15.गर्भपात: एक नैतिक समस्या : डॉ. दिलीप नागरगोजे ... 081
16.वेश्यावृत्ती: चिंतन,एक काळाची गरज : डॉ. नरेन्द्र रघटाटे ... 085
17.कृत्रिम बुद्धिमत्ता एक नैतिक आव्हान! : डॉ. रीना अविनाश पितळे ... 098
18.लिंगभेद आणि समता : डॉ.सुनील साळुंके ... 107
19.मुल्यविचार : डॉ.सुनील अं. काळमेघ. ... 111
20.विवाह – आधुनिक आव्हाने : डॉ. सुनिलदत्त गवरे ... 114
21.विचाराच्या दमनाचा दुष्परिणाम–अपंगत्व : डॉ.वेदप्रकाश डोणगावकर ... 120
22.स्त्रीवादाचे नीतिशास्त्र : शितल येरुळे ... 124
23.आचरण : डॉ. सुरेखा आडगावकर ... 127
24.प्रसार माध्यमातील (मोबाईल) अनैतीकता आणि वाढणारे नैराश्य : डॉ.वृषाली आंबटकर ... 135
25.वैद्यकीय व्यवसायातील अनैतिकता : एक ज्वलंत प्रश्न : डॉ.विजय शेडगे ... 139
26.वैद्यकीय नीतिशास्त्र : समस्या व उपाय :डॉ. बाळासाहेब मुळीक ... 144


T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Tq.& Dist.Hingoli (MS.)

## 08.सरोगसी आणि नैतिकता

डॉ. भुसारे सुनंदा रामचंद्र

आज घडीला विज्ञानाने प्रत्येक क्षेत्रात प्रगती केली आहे. विज्ञान ही माणसाने अतीउच्च अशी घेतलेली झेप आहे. असंख्य अशा सोईसुविधा आज माणसाच्या पायाशी लोळण घेत आहेत. प्रत्येक काम जाग्यावर बसून वायरलेसने करण्याचा जमाना आला आहे. जग जवळ आलं. एक क्लिकवर आलं आहे. अशी अनेक उदाहरणे आपण मानवाने केलेल्या प्रगतीची देत असतो. पण विज्ञानाने केलेल्या प्रगतीचे मानवाला जेवढे फायदे आहेत तेवढेच तोटे ही त्याला सहन करावे लागत आहेत. उदा. चुल जावून घरात गॅस आला खरा पण त्यामुळे जेवणाची (चुलीवरच्या) चव हरवली. सांगवा जावून टेलीफोन आला पण एकमेकांना भेटण्याची अतुरता, ओढ संपली. टि.व्ही., मोबाईल आले आणि घरातील माणसं एकत्र असून एकटी पडली. तिच बाब सरोगसी तंत्रज्ञान म्हणजेच भाडोत्री मतृत्वाची झाली.

विज्ञानाच्या मदतीने आवयव दानाने आनेकांना जीवदान मिळत आहे. विज्ञानाच्या मदतीने प्रतिमानव म्हणजे टेस्टट्युब बेबी, क्लोन तयार करण्यातही माणसाने यश मिळवले आहे. याचा फायदा असा झाला की जे जोडपे निपुत्रिक, निःसंतान आहेत त्यांनाही पुत्र प्राप्तीचे सुख आता लाभत आहे. पण माणसाने जशी प्रगती केली तसाच तो अनैतिकही बनत चालला आहे हे त्याचे (विज्ञानाचे) तोटे ही आपल्या लक्षात घ्यावे लागतील. विज्ञानाच्या मदतीने मानवी बीज फलनाच्या संदर्भातही उत्कृष्ट अशा प्रकारची प्रगती मानवाने केली आहे. आज घडीला वंध्यत्व मग ते स्त्रीचे असो अथवा पुरुषाचे जवळ जवळ संपलेच आहे. पूर्वीच्या काळी जेव्हा एखाद्या जोडप्याला फलनामध्ये अडथळे येवून पुत्र प्राप्ती होत नसे तेव्हा शेवटचा पर्याय म्हणून



T.C
Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta.& Dist.Hingoli (M.S.)

अपल्याच आप्तातील किंवा बाहेरचे एखादे मूल (मुलगा) दत्तक घेण्याची प्रथा होती. पण विज्ञानाच्या प्रगतीमुळे आज बऱ्याच प्रमाणात ही पध्दत मागे पडली आहे. कारण प्रत्येक जोडप्याला अशी इच्छा असते की आपल्या रक्ताचे एक तरी मूलं असले पाहिजे.

नवनिर्मिती किंवा नवीन आपत्याला जन्म देणे ही बाब निसर्गतःच सुखावह किंवा सुख देणारी आहे. असे असले तरी या बाबीचे महत्त्व ज्यांना आपत्य सुख खूप मोठ्या कालावधी नंतर लाभले त्यांना असते. तसेच ज्यांना ते सुख लाभलेच नाही अशांना ही अभिलाषा फार मोठ्या प्रमाणावर असते. मानवी समाजाचा विचार करता प्रजोत्पादन किंवा नवनिर्मिती ही मानवी अस्तित्वासाठी महत्त्वपूर्ण मानली जाते. मानवी संस्कृतीच्या जोपासनेसाठी प्रजोत्पादन महत्त्वपूर्ण मानले जाते. त्या अनुषंगाने प्रत्येक जोडप्याचे पूर्णत्व म्हणजे त्यांच्या मार्फत झालेली नवनिर्मिती होय. त्यामुळे त्या संदर्भातील आनंद हा त्या जोडप्यासाठी अलैकिक आनंदापेक्षा वेगळा नसतो. पण ह्याच आनंदाला काही जणांना मुकावे लागते कारण त्यांना मूलं होत नाही.

मूल न होने म्हणजे वंध्यत्व येणे होय. आज विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या काळात वंध्यत्व निवारणासाठी अनेक विविध उपाययोजना केली जाते. त्यापैकी अनेक प्रचलीत पध्दती लोकप्रियही आहेत. त्यापैकी एक म्हणजे भारतात अधिक लोकप्रिय ठरलेली एक पध्दत म्हणजे सरोगसी होय. सरोगसी म्हणजे भाडोत्री मातृत्व होय. हे भाडोत्री मातृत्व म्हणजे गर्भाशय भाड्याने देणे होय. एखाद्या स्त्रीला मूल होत नसेल तर तिच्या पतीचे शुक्राणु घेवून एखाद्या दुसऱ्या स्त्रीच्या गर्भाशयात सोडणे व त्याच ठिकाणी ते नऊ महिने विकसित होउ देणे होय.त्या मोबादल्यात त्या स्त्रीला नउ महिने सर्व प्रकारचे आर्थसहाय्य, दवाखाना, मोबादला देण्यात येत असतो. हा मोबादला त्या स्त्रीला त्या जोडप्याकडून दिला जातो. या प्रक्रियेसाठी अनेक प्रकारचे कायदे करण्यात आले असले तरी त्या कायद्यांचे तंतोतत पालन केलेच जाते असे नाही. त्यात महत्त्वाचा आणि पहिला नियम

म्हणजे ज्यांना मूल हवे आहे त्यांच्या आप्तातील किंवा निकटवर्तीयातील म्हणजेच आई, बहिण, सासु, ननंद, जाऊ यांच्यातील कोणीही सरोगसीसाठी त्या जोडप्याने निवडणे आवश्यक असते. पण या नियमाकडे कुणाचेही लक्ष नसते.

आज घडीला भारत ही सरोगसची मोठी बाजारपेठ बनला आहे. कारण पाश्चात्य देशामध्ये मोठ्या प्रमाणावर अशाप्रकारचे फॅड आहे की मातृत्व स्वत:कडे घ्यावयाचे नाही. त्यासाठी पाश्चात्य संस्कृतीतील लोकांचा फार मोठा लोंढा आज भारतामध्ये येतो आणि सरोगसी तंत्राने मूल जन्माला घालतो आणि घेवून जातो. या पाठीमागे पाश्चात्य देशातील स्त्रियांचा हेतू किंवा बाळाची आई या व्यक्तीकडे बघण्याचा दृष्टिकोन अतिशय अनैसर्गिक अशा प्रकारचा म्हणावा लागेल. त्यामुळे मानवाचे शोषण करण्याची प्रवृती लोकांमध्ये मोठ्या प्रमाणात वाढत आहे. त्याच प्रमाणे सरोगसीमुळे समाजात दोन गट साधारणत: निर्माण होत आहेत. त्यापैकी एक म्हणजे गरीब म्हणजे शोषित वर्ग व दुसरा श्रीमंत म्हणजे शोषक वर्ग होय. आज घडीला ही जैव नितिशास्त्राची नैतिक समस्या बनली आहे. पाश्चिमात्य जगातील असंख्य लोक भारतात येत आहेत आणि सरोगसी तंत्रज्ञानाचा वापर करुन मूल घेऊन जात आहेत.

भाडोत्री मातृत्व हा मोठा व्यापार झाला आहे. श्रीमंत लोकांनी गरीब जनतेची पिळवणूक करण्याचा हा प्रकार आहे. हा प्रकार थांबवण्यासाठी कायदेशीररित्या प्रयत्न करणे गरजेचे आहे. आणि तसे प्रयत्न काही प्रमाणात केले जात असले तरी म्हणावी तेवढया प्रमाणात कायद्यांची अमलबजावणी या संदर्भात केली जात नाही. किंवा ते कायदे श्रीमंत लोक पालन करत नाहीत. त्यामुळे अर्थिकदृष्ट्या मागासवर्गाची अतोनात पिळवणूक होत असल्याचे आपण पाहतो.

सरोगटे मदरस् किंवा भाडोत्री मातांच्या संदर्भात विचार केला असंता असे लक्षात येते की, या मातांचे असंख्य प्रश्न आहेत. त्यासंबंधी कसल्याच प्रकारचा विचार करण्याची कुणाला गरज भासत नाही. भाडोत्री



माता या अर्थिकदृष्ट्या मागासवर्गातीलच असतात. त्यांचा या कृत्यामागील उद्देशच कुटुंबाच्या भरण पोषणासाठी पैसा मिळवणे हा असतो. त्यामुळे त्या स्वता:चा कसलाही विचार न करता ही मोठी जोखीम स्वत:वर ओढवून घेतात. गरीब असल्यामुळे खाण्यापिण्याचे प्रश्न, दैनंदिन व्यवहार हे त्यांच्या समोरचे संकट असते. यामुळे अगोदरच झिजलेले शरीर आणखी जास्त झिज सहन करु शकत नाही. कारण गर्भारपणा आणि बाळंतपण यासाठी स्त्रियांना फार मोठी शक्ती खर्च करावी लागत असते. स्त्रियांच्या शरीर रचनेचा विचार केला असता तिच्या ठिकाणी निर्मितीक्षमता आहे. या कारणामुळे तिचे शरीर पुरुषांच्या शरीरापेक्षा थोडेफार वेगळे आहे. तिचा रुतुकाल, त्यासाठी खर्च होणारी शक्ती, तसेच निर्मिती क्षमतेसाठी लागणारी शक्ती. परत या क्रिया तिच्या ठिकाणी सतत घडत असतात. त्यामुळे पुन्हा पुन्हा शरीराची होणारी झिज तिला सहन करावी लागते. त्यातच ती स्त्री जर गर्भारपणाचा व्यापर करत असेल तर तिच्या शारीरिक आरोग्याबद्दल बोलायलाच नको. तिच्या रुतुकालात होणारा रक्तस्त्राव, परत गर्भारपणात लागणारा रक्त पुरवठा, होणारी हडांची झिज आणि कॅल्शियमची कमी तसेच गरीबीमुळे सकस आहाराची कमी अशा स्थितीत या स्त्रिया मोठी जोखीमच आपल्या अंगावर पेलतात. आणि ही जोखीम काही वेळा नव्हे बहुतेक वेळा त्यांच्या जीवावरही बेतते.

सरोगेट मातांची अशी बिकट स्थिती असतानाही आज भारतातील बहुतेक मोठ्या शहरांमध्ये हा व्यवसाय मोठ्या प्रमाणात राजरोसपणे सुरु असल्याचे दिसून येते. त्यावेळी सरोगसी आणि सरोगेट मदरसच्या पुनर्वसनाचे त्यांना जडणाऱ्या विविध असाध्य आजारांचे प्रश्न आज समाजाला भेडसावत आहेत. त्या दृष्टिकोनातून विचार करण्याची आपली प्रत्येकांची भारतीय नागरीक म्हणून एक नैतिक जबाबदारी आहे,बांधीलकी आहे की या प्रश्नांना आपण कुठेतरी वाचा फोडली पाहिजे.

जेव्हा या प्रक्रियेसाठी अर्थिकदृष्ट्या गरजू स्त्रियांचा शोध घेतला जातो तेव्हा त्यांची आर्थिक स्थिती मागास आहे हे लक्षात घेवून त्यांच्या



Lecturer
Shivaji College,Hingoli
Ta.& Dist.Hingoli (MS.)
SHIVAJI COLLEGE • HINGOLI
Scanned with OKEN Scanner

हतबलतेचा फायदा घेवून त्यांना पैशाची लालूच दाखवली जाते व त्यांना हे सरोगसीचे ओझे त्या स्त्रीवर टाकले जाते. अशिक्षित असलेल्या स्त्रियांची पिळवणूक केली जाते. ज्यांना कायद्याचे ज्ञान नाही सरोगसीसाठी अनेक कायदे करण्यात आले असले तरी त्यांची अमलबजावणी केली जात नाही. हा व्यवहार करार पध्दतीने केला जातो. त्यात जो पर्यंत त्या स्त्रीच्या गर्भात मूल आहे तो पर्यंत त्या स्त्रीच्या उदरनिर्वाहचा, उपजिविकेचा खर्च संबंधीत व्यक्ती करते. पण खरा प्रश्न तेव्हा उद्भवतो जेव्हा त्या महिलांचे बाळांतपणा नंतरचे प्रश्न निर्माण होतात. एक तर त्यांचा भावनिक प्रश्न असतो. नऊ महिने पोटात वाढवलेले बाळ एकदम तोडून टाकायचे. आईचे वात्सल्य या ठिकाणी त्याची कठोर परिक्षा असते. कारणे तिची ती आवस्था भावनिक गुंतवणूकची झालेली असते. तर दुसरीकडे काही श्रीमंत लोक मूल घेण्यास नकार देतात आणि त्या गरीब स्त्रीवर संगोपनाचा बोजा पडतो.

अशा प्रकारे सरोगसी तंत्रज्ञानाचा फायदा श्रीमंत लोक, समलैंगीकता, लिव्ह इन रिलेशनशीप, एकल पालकत्व अशा सारख्यांना याचा फायदा झाला तर दुसरीकडे श्रीमंत लोक व्यंग निघेल का? अनुवंशिकता येते का? अशा भितीमुळे ते मूल स्वीकारण्यास नकार देतात आणि शेवटी त्या मुलाचे पोषण करण्याचे काम / जवाबदारी त्या गरीब स्त्रीवर येते. सरोगसी हे तंत्रज्ञान निपुत्रीक दाम्पत्यासाठी वरदान ठरत असले तरी काही वेळा तसेच गरीब जनतेचे शोषण करणारे ठरत आहे. या प्रकरणात सरोगेट मदरच्या भावनेचा प्रश्न असतो. तसेच तिच्या उपजिविकेचाही प्रश्न उद्भवतो. त्याच बरोबर त्या सरोगेट मदरच्या पोटात राहून तिची अनुवंशीकता त्या बाळात येते का? म्हणजेच त्याच्या सरोगेट आईचे काही अनुवंशीक आजार त्या बाळाला होतील का ? असे अनेक प्रश्न निर्माण झाल्यामुळे काही दाम्पत्य ते मुल स्वीकारण्यास नकार देतात.

ज्या स्त्रियांची आर्थिक स्थिती बिकट असते अशा स्त्रियांकडून सरोगसी करुन घेतली जाते. त्यामुळे श्रीमंत लोकांची ही नैतिक जवाबदारी ठरते की, त्या स्त्रीच्या उदरनिर्वाहाची त्यानी काळजी घेतली पाहीजे.



सरोगेट मदरला वाऱ्यावर सोडून दिले नाही पाहीजे. विज्ञानाच्या प्रगतीमुळे माणसाने यशाचे अति उच्च शिखर गाठले आहे. पण हेच विज्ञान व्यवस्थित वापरले तर वरदान आणि अति वापर केला तर तो माणसासाठी शाप ठरत आहे. म्हणून माणसाने त्याची नैतिक जबाबदारी ओळखून जगणे हे गरजेचे असते.

•••

SHIVAJI COLLEGE • HINGOLI •
T. C
Assistant Professor
Shivaji C...
Tq.& Dist. Hingoli (M.S.)



Scanned with OKEN Scanner